# राज्य राजकारण:
## मुद्दे आणि पेचप्रसंग



संपादक
डॉ. रत्नाकर बाबुराव लक्षटे
डॉ. माधव माणिकराव चोले

# परिकल्पना

© सम्पादकाधीन

प्रथम संस्करण : 2023

ISBN : 978-93-95104-59-3

मूल्य : ₹ 695

शिवानंद तिवारी द्वारा *परिकल्पना, के-37, अजीत विहार, दिल्ली-110084* से प्रकाशित और शेष प्रकाश शुक्ल, दिल्ली से टाइप सेट होकर *काम्पैक्ट प्रिंटर्स, दिल्ली-110032 में मुद्रित*

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College
Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

# अनुक्रम


संपादकीय 4

1. केंद्र राज्य संबंधातील सरकारिया आयोगाच्या शिफारशी 13
   *–शाम गंगाधर आवटे*

2. भारतीय संघराज्यातील वित्त आयोगाची भुमिका 16
   *–डॉ. कल्याण गोलेकर*

3. संघराज्यापुढील नवीन आर्थिक आव्हाने 20
   *–विश्वंभर धर्मा गायकवाड*

4. महाराष्ट्रातील आघाडीच्या राजकारणाची बदलती दिशा 25
   *–प्रा. डॉ. कदम एच. पी.*

5. महाराष्ट्रातील पक्ष फुटीचे राजकारण 30
   *–प्रा डॉ. आंधळे बी.व्ही.*

6. राज्यपाल तत्व आणी व्यवहार 36
   *–मुकुंद येगांवकर*

7. औरंगाबाद शिक्षक मतदार संघ निवडणूक-2023 45
   *–प्रा.डॉ.माधव चोले*

8. केंद्र आणि राज्यशासनातील सीएए आणि एनआरसी संघर्षाचा अभ्यास 51
   *–रंदिल महेश गजेंद्र, डॉ. डोंगरे लक्ष्मण भीमराव*

9. भारतीय संघराज्य आणि स्वतंत्र राज्यांची मागणी 57
   *–डॉ. संजय गायकवाड*

10. केंद्र-राज्य समन्वयातील राष्ट्रीय विकास परिषदेची भूमिका 61
   *–प्रो. डॉ. विलास आघाव*

11. राज्यपालपदाचे राजकीयकरण 67
   *–डॉ. आर. डी. शिंदे*

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College
Sonpeth
Dist.Parbhani
(M.S.)

# 5. महाराष्ट्रातील पक्ष फुटीचे राजकारण

*प्रा डॉ. आंधळे बी.व्ही.*
*राज्यशास्त्र विभाग*
*कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ, जि. परभणी*

महाराष्ट्र हे देशातील एक प्रगतशील राज्य मानल्या जाते. छत्रपती शिवाजी महाराज, म. ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय विचारांचा वारसा लाभलेल्या या राज्याची वैचारिक जडणघडण वेगळी अशी आहे. याशिवाय एस. एम. जोशी, कॉ. श्रीपाद अमृत डांगे, बाळासाहेब देसाई, केशवराव धोंडगे,ना.ग. गोरे, धनंजय गाडगीळ, शालिनीताई पाटील, प्रतिभा पाटील, प्रभा राव,गणपतराव देशमुख, शरद पवार, बाळासाहेब ठाकरे, गोपीनाथराव मुंडे, आर.आर. पाटील, प्रकाश आंबेडकर आणि रामदास आठवले यासारख्या विविध राजकीय नेत्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात आपला वेगळा ठसा उमटवला आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात यशवंतराव चव्हाणांपासून ते आजच्या एकनाथ शिंदे यांच्यापर्यंतच्या सर्व मुख्यमंत्र्यांनी फोडाफोडीचे राजकारण केले आहे. या फोडाफोडीच्या राजकारणामुळे महाराष्ट्राची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक अधोगती झाली आहे.

**महाराष्ट्रातील पक्ष फुटीचा इतिहास** : महाराष्ट्र राज्याची स्थापना 1 मे 1960 रोजी झाली. आणि महाराष्ट्र राज्यात पहिल्या सार्वत्रिक निवडणुका 1962 मध्ये झाल्या. या निवडणुका भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, समाजवादी पक्ष, प्रजा समाजवादी पक्ष शेतकरी कामगार पक्ष, आणि अपक्ष यांनी निवडणूका लढविल्या. तेव्हापासून महाराष्ट्राच्या राजकारणात अनेकदा राजकीय पक्षांमध्ये फाटाफूट झाली आहे. 1962 मध्ये यशवंतराव चव्हाण यांनी बेरजेचे राजकारण करत प्रभाकर कुंटे, मोहन धारिया, रामभाऊ तेलंग, आण्णासाहेब शिंदे, शंकरराव मोरे, यशवंतराव मोहिते, दादासाहेब

गायकवाड, दादासाहेब रूपवते यांना फोडून कॉंग्रेस पक्षात आणले.पुढे शरद पवार यांनी 1978 वसंतदादा पाटील यांचे सरकार पाडले व पुलोद आघाडीचे सरकार स्थापन केले. 1980 ला पुलोदला खिंडार पडले.47 पैकी 41 पुलोदचे आमदार कॉंग्रेस पक्षात गेले. 1985 च्या विधानसभा निवडणुकीत शरद पवार यांचे 54 आमदार निवडून आले.पुढे राजीव गांधी यांनी शरद पवार यांच्या पक्षाला कॉंग्रेसमध्ये विलीन करून घेतले.1999 मध्ये पुन्हा शरद पवार यांनी कॉंग्रेस पक्षातून फुटून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची स्थापना केली. 2005 मध्ये नारायण राणे यांनी शिवसेना पक्ष सोडून महाराष्ट्र स्वाभिमानी पक्ष व राज ठाकरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षाची स्थापना केली. शेतकरी संघटना, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षात अनेक वेळा फाटाफूट झाली आहे. पण 2022 व 2023 या वर्षात शिवसेना व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष यांच्यात जी पक्ष फुट झाली आहे त्यांने महाराष्ट्राच्या राजकारणात वेगळ्याच प्रकारच्या राजकीय पक्ष फुटीचा गोंधळ निर्माण केला आहे असे म्हणता येईल.

**आघाडी सरकारे :** सन 1956 ते 1977 या काळात महाराष्ट्राच्या राजकारणात कॉंग्रेस पक्षाचे वर्चस्व राहिले आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून ते 1995 पर्यंत कॉंग्रेस पक्ष सत्तेवर राहिला आहे.यात फक्त 1978-1980 या काळात पुरोगामी लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर होते.

1975 च्या आणीबाणीनंतर 1977 मध्ये केंद्रात मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली जनता पक्षाचे सरकार स्थापन झाले. त्यानंतर 1978 साली महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका झाल्या. यात भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये फूट पडून इंदिरा कॉंग्रेस व रेड्डी कॉंग्रेस असे विभाजन झाले. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील शरद पवार हे रेड्डी गटात गेले. तर वसंतराव नाईक, शंकरराव चव्हाण, नाशिकराव तिरपुडे हे इंदिरा गटात सामील झाले. दोन्ही कॉंग्रेस पक्षांनी एकमेकांच्या विरोधात निवडणूका लढविल्या. जनता पक्ष व मित्र पक्ष यांना सर्वाधिक जागा मिळाल्या. पण निवडणुकीनंतर दोन्ही कॉंग्रेस पक्षांनी एकत्र येऊन वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त सरकार स्थापन केले. परंतू हे सरकार अल्पजीवी ठरले. शरद पवार यांच्यासह सुशीलकुमार शिंदे, दत्ता मेघे व सुंदरराव साळुंके यांनी बंड करून 44 आमदारांना सोबत घेऊन 18 जुलै 1978 रोजी वसंतदादा पाटील यांचे सरकार पाडले. आणि जनता पक्ष व इतर पक्षांच्या मदतीने पुलोद आघाडीचे सरकार स्थापन केले.

सन 1995-2019 या काळात महाराष्ट्राच्या राजकारणात आघाडी सरकारे स्थापन झाली.या आघाडी सरकारांच्या कार्यकाळात अनेकदा राजकीय पक्षांमध्ये